# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : Desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : २/एनजीसी/इंजि./मान्यता/२०१७/ ६५९१

दिनांक : 07 JUN 2017

प्रति,
प्राचार्य,
माईर्सचे,
एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे
इंजिनिअरींग ॲन्ड रिसर्च,
लातूर रोड, एमआयडीसी जामगाव,
बार्शी, सोलापूर - ४१३ ४०१

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर नवीन अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. वेस्टर्न/२०१७/१-२८६९५२१९४१ दि. १० एप्रिल, २०१७.

२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१७/प्र.क्र.२१४/तांशि-४, दि. १५ मे, २०१७.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना-अनुदान तत्वावर अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची संस्था खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | सिव्हिल इंजिनिअरींग | ६० |
| २. | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |
| ३. | इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| ४. | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे. तसेच आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदान तत्वावर पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु २२.५० लाख खाते क्र. ०५३०४५११०००३९०२ दि. २२.०५.२०१७, अन्वये बँक ऑफ इंडिया, शाखा - एमआयटी कॉलेज शाखा, पुणे येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच द्वितीय वर्षासाठी रु. २२.५० लाख संयुक्त खात्यात जमा करुन सदर मुदत ठेवीची मूळ पावती पडताळणीसाठी या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास व संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/वास्तूकला परिषद तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. शासनाने, या संचालनालयाने, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व वास्तूकला परिषद, नवी दिल्ली / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली/वास्तूकला परिषद, नवी दिल्ली यांच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त तसेच संदर्भीन शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

(चंद्रशेखर ओक भा.प्र.से.)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- १. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : Desk2@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : २/एनजीसी/अभ्यासक्रम नावबदल/२०१७/१०१३

दिनांक : - 4 OCT 2017

प्रति,
प्राचार्य,
माईर्सचे,
एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे
इंजिनिअरींग ॲन्ड रिसर्च,
लातूर रोड, एमआयडीसी जामगाव,
बार्शी, सोलापूर - ४१३ ४०१

**(डीटीई कोड ६९०१)**

विषयः- अभ्यासक्रमाचे नावात बदल करण्याबाबत

संदर्भः- शासन निर्णय क्र.टीईएम–२०१७/प्र.क्र.३६६/तांशि–४ दि. २१ सप्टेंबर, २०१७.

वरील विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, शासनाने संदर्भाधिन शासन निर्णयान्वयें आपल्या संस्थेत सुरु असलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या नावात खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे बदल करण्यास मान्यता दिलेली आहे.

| अनु.क्र. | अभ्यासक्रमाचे पूर्वीचे नाव | अभ्यासक्रमाचे सुधारित नाव |
|---|---|---|
| १. | कॉम्प्युटर इंजिनिअरीग | कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरींग |

शासनाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या नावात बदल करण्यास या संचालनालयाकडून मान्यता देण्यात येत आहे.

(ए.ई.रायते भा.प्र.से.)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

प्रति-
१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा.कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र. ३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.

D:\sandhya\change of name final.doc


MAEER's MITCORER, JAMGAON, BARSHI
Inward No. : 48
Inward Date : 25/10/17
Inward By
Checked By